सद्रक्षाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

भ्रमरध्वणी क्र.9819208279

**प्रेसनोट** दि.२७.०९.२०२४

## ठाणे शहर, पोलीस आयुक्तालयातर्फे सायबर गुन्हे जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याबाबत....

इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि त्याच बरोबरीने सायबर गुन्हयांमध्ये होणारी वाढ लक्षात घेता, नागरिकांमध्ये सायबर गुन्हयांबाबत जनजागृती करण्यासाठी मा. पोलीस आयुक्त, श्री. आशुतोष डुंबरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), डॉ. पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त, सायबर व आर्थीक गुन्हे शाखा, श्री. पराग मनेरे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, सायबर व आर्थीक गुन्हे शाखा, श्री.दत्तात्रय पाबळे, यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे विविध जनजागृतीपर उपक्रम आयोजित केले जात आहेत. 'Prevention is better than Cure' या तत्वाप्रमाणे सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी लहान मुलांपासून जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना सायबर गुन्हयांची तसेच त्यापासून सुरक्षित कसे राहता येईल याची माहिती देण्यासाठी सायबर गुन्हे जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.




**विद्या** प्रसारक मंडळ, बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे येथे सायबर सेल, ठाणे शहर यांच्यावतीने आयोजीत करण्यात आलेल्या सायबर गुन्हयांबाबत जनजागृती कार्यशाळेत २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांना प्रचलित सायबर गुन्हयांबाबत तसेच इंटरनेटचा सुरक्षित व जबाबदारीने वापर कसा करावा याबाबत देखील माहिती देण्यात आली.

त्यावेळी सायबर सेल ठाणे शहर येथील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांचे एक '**सायबर वॉरीयर पथक**' तयार करण्यात आले. सदरचे पथक हे ठाणे शहर तसेच आजुबाजूच्या परिसरातील शाळा, कॉलेज तसेच सार्वजनिक ठिकाणी सायबर गुन्हयांबाबत पथनाटय तसेच व्याख्यानाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे काम करणार आहे.

**सहयोग** मंदीर हॉल, घंटाळी रोड, ठाणे येथे जेष्ठ नागरिकांसाठी सायबर गुन्हयांच्या जनजागृतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये जेष्ठ नागरिकांसोबत घडणारे सायबर गुन्हे, त्यापासून बचाव करण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत चर्चासत्र आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमास बॅक ऑफ इंडियामधील सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचारी यांचा समावेश होता.





**भिवंडी** येथील जी.एम. मोमीन, वुमन्स कॉलेज, विद्यार्थ्यांकरीता सायबर सेल, ठाणे शहर यांच्या वतीने सायबर गुन्हयांच्या जनजागृतीनिमित्त कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदरवेळी महिलांसोबत घडणारे सायबर गुन्हे तसेच इंटरनेटचा सुरक्षित व जबाबदारीने वापर कसा करावा, याबाबत माहिती देण्यात आली. या कार्यशाळेसाठी अंदाजे २०० ते २२५ महिला विद्यार्थी हजर होते.



**एअरफोर्स** स्टेशन, येऊर ठाणे येथे दर महिन्याला भारतीय हवाई दलातील मधील अधिकारी आणि स्टाफ यांच्याकरीता सायबर गुन्हे जनजागृती, प्रचलित सायबर गुन्हयांची कार्यपद्धती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. सदर शिबिरामध्ये प्रचलित सायबर गुन्हयांची माहिती देवून त्यांना त्याबाबत कसे सुरक्षित रहाता येईल याबाबत माहिती देण्यात येते.

**पारसिक** नगर, कळवा, ठाणे परिसरामधील रहिवासी संकूलातील नागरिकांकरीता सायबर गुन्हे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास अंदाजे २०० ते २२५ नागरिक हजर होते. नागरिकांना सायबर गुन्हयांबाबत माहिती देवून त्या पासून कसा बचाव करावा? याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच त्यांच्या शंकांचे देखील निसरन करण्यात आले.



अशाप्रकारे वाढत्या सायबर गुन्हेगारीपासून लोकांना सावध करण्यासाठी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हददीत सायबर गुन्हयांबाबत जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबतच्या सुचना **मा.पोलीस आयुक्त, श्री.आशुतोष डुंबरे** यांनी दिलेल्या असून त्याप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

**मा.पोलीस आयुक्त, आशुतोष डुंबरे** यांनी समस्त नागरिकांना आवाहन केले आहे की, ऑनलाईन माध्यमातून कोणत्याही अनोळखी व्यक्तींच्या बोलण्यावर विश्वास ठेवून, अमिषाला किंवा भितीला बळी पडू नका. आपल्यासोबत सायबर गुन्हा घडल्यास तात्काळ '१९३०' किंवा 'cybercrime.gov.in' या शासनाच्या सायबर पोर्टलवर तात्काळ आपली तक्रार नोंद करा.



( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर